**<u>ठळक बातम्या</u>**

- असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना मातृत्व संरक्षणाचे लाभ देण्याची राष्ट्रीय महिला आयोगाची केंद्र सरकारला शिफारस

- पुण्यातल्या डेक्कन कॉलेजमध्ये अभिजात मराठी उत्कृष्टता केंद्र स्थापन करायला केंद्र सरकारची मान्यता

- जागतिक पातळीवर व्यापारात निर्माण झालेले अडथळे दूर करण्यासाठी WTO च्या निकषांवर आधारित पर्याय शोधण्याचं भारताचं जी २० च्या मंचावर आवाहन

**आणि**

- आशियाई स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंना आज ६ सुवर्णपदकं, पदक तालिकेत भारत पाचव्या स्थानी

**<><><><><>**

महिलांना मिळणाऱ्या मातृत्व आणि बालसंगोपनाच्या लाभांची व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीनं राष्ट्रीय महिला आयोगानं असंघटित क्षेत्रातल्या, गिग आणि प्लॅटफॉर्म कामगार महिलांनाही या लाभांच्या कक्षेत आणण्याची शिफारस केली आहे. देशातल्या ९० टक्क्यांहून अधिक महिला कामगारांना सध्या या लाभांचं प्रभावी संरक्षण मिळत नसल्याचं आयोगानं नमूद केलं आहे.

बालसंगोपन रजा फक्त आईपुरती मर्यादित न ठेवता दोन्ही पालकांमध्ये समान विभागली जावी, सध्याची ७३० दिवसांची बालसंगोपन रजा, एकाच संस्थेत काम करणाऱ्या दोन्ही पालकांना प्रत्येकी ३६५ दिवस दिली जावी, असं आयोगानं सुचवलं आहे. २०३०पर्यंत टप्प्याटप्प्यानं खासगी क्षेत्रातही बालसंगोपन रजा आणणं, पगारी पितृत्व रजा सक्तीची करणं आणि पाळणाघरांची संख्या ५ लाखावर

नेणं या शिफारशींचाही यात समावेश आहे. मूल दत्तक घेतलेल्या मातांसाठीची रजा १२ आठवड्यांवरून २६ आठवडे करण्याची शिफारसही आयोगानं केली आहे.

<><><><>

फ्लायदुबईचे वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप असलेल्या सहवैमानिकाला अबुधाबी इथं हलवण्यात आलं आहे. सौदी वृत्त संस्थेनं सौदी गृहमंत्रालयाच्या हवाल्यानं दिलेल्या माहितीनुसार वैद्यकीय तपासणीनंतर दोन्ही वैमानिकांना अबूधाबीला हलवण्यात आलं. कॅप्टन स्मित यांना संयुक्त अरब अमिरातीत आणलं असून त्यांची प्रकृती सुधारत असल्याचं भारतीय दूतावासानं कालच सांगितलं होतं.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कॅप्टन स्मित यांच्याशी संवाद साधला. स्मित यांच्या शौर्याची आणि प्रसंगवधानाची प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली आणि त्यांना लवकरात लवकर बरं वाटावं अशी कामना केली.

**.... होल्ड- बाईट- प्रधानमंत्री- - -**

यावेळी स्मित यांनी विमानातला घटनाक्रम प्रधानमंत्र्यांना सांगितला, आणि त्यांचे आभार मानले.

<><><><>

केंद्र सरकारनं पुण्यात अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र उभारायला मंजुरी दिली आहे. डेक्कन कॉलेजमध्ये हे केंद्र स्थापन केलं जाईल. याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचं काम राज्य सरकारने आधीच हाती घेतले होतं. तो केंद्राकडे सादर करुन आवश्यक निधी प्राप्त करण्याचा मार्गही यामुळे मोकळा होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली.

आसाम, बंगाली, पाली आणि प्राकृत भाषेचं अभिजात केंद्र स्थापन करायलाही केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे.

<><><><>

प्रधानमंत्र्यांना भेट म्हणून मिळालेल्या वस्तूंच्या आठव्या ई-लिलावाला ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या लिलावात दिल्लीच्या विविध पैलूंचं दर्शन घडवणाऱ्या ३० स्मृतिचिन्हांचा समावेश आहे. यात फोटोफ्रेम, मूर्ती, शिल्पं, दिल्ली मेट्रोच्या प्रतिकृती, क्रीडा स्मृतिचिह्नं आणि इतर कलात्मक वस्तूंचा समावेश आहे. या लिलावातून मिळणारा निधी ‘नमामि गंगे’ प्रकल्पासाठी वापरला जाणार आहे.

**<><><><>**

मिठी नदीतला गाळ काढण्याच्या कथित ६५ कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणात अभिनेता दिनो मोरिया याची आज मुंबई पोलिसांकडून चौकशी करण्यात आली. मिठी नदीतला गाळ काढण्यासाठी मुंबई महापालिकेने दिलेल्या कंत्राटातल्या आर्थिक अनियमिततेसाठी त्याला चौकशीसाठी बोलवण्यात आलं होतं. पालिकेने कोची इथल्या मॅटप्रॉप नावाच्या कंपनीकडून घेतलेल्या उपकरणांच्या मदतीने गाळ काढण्यासाठीचा प्रकल्प हाती घेतला होता. मात्र, या प्रकरणातला मुख्य आरोपी केतन कदम याने या उपकरणांची बनावट बिलं तसंच वाढीव दर दाखवून ६५ कोटी रुपये वसूल केले होते. कदम याची चौकशी करताना त्याचा अभिनेता दिनो मोरिया याच्याशी अनेकदा फोनवरून संवाद झाल्याचं समोर आलं आहे.

**<><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त तसंच माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२२व्या जयंतीनिमित्त आज देशभरात दोन्ही नेत्यांना आदरांजली वाहण्यात आली.

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी दिल्लीतल्या राजघाट इथं सर्व धर्म प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी राजघाटावर बापूजींना आदरांजली वाहिली. लाल बहादूर शास्त्री यांच्या

जयंतीनिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह अनेक मान्यवरांनी विजयघाट इथं त्यांना आदरांजली वाहिली. यानिमित्तानं राज्यातही अनेक ठिकाणी अभिवादन कार्यक्रम झाले.

<><><><><>

जागतिक पातळीवर व्यापारात निर्माण झालेले अडथळे दूर करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेच्या निकषांवर आधारित पर्याय काढण्याचं आवाहन केंद्रीय व्यापार आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केलं आहे. अमेरिकेत जी 20 देशांच्या व्यापार मंत्र्यांच्या परिषदेत ते बोलत होते.

व्यापारात निर्माण झालेल्या अडथळ्यांना काही देशांकडून केल्या जात असलेल्या मदतीवर त्यांनी नाराजी व्यक्त केली. यामुळं गरीब देशांमध्ये मनमानी किंमतीवर हा माल विकला जाण्याची भिती त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

चंडीगढच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठात झालेल्या हिंसाचाराप्रकरणी पोलिसांनी ७ विद्यार्थ्यांसह ९ जणांना अटक केली आहे. यापैकी एकजण अल्पवयीन आहे. या प्रकरणात जाळपोळ, लुटालूट, दंगल करणं, मालमत्तेचं नुकसान, पोलिसांच्या गाड्यांची जाळपोळ, पोलिसांवर हल्ले करणं आणि राष्ट्रीय महामार्ग अडवून धरल्याप्रकरणी २ एफआयआर दाखल केल्याची माहिती जालंधर परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक नवीन सिंगला यांनी दिली. पतियाळा जिल्ह्यातल्या चित्कारा विद्यापीठात २ विद्यार्थिनींनी कथितरीत्या आत्महत्या केल्यावरून गेल्या आठवड्यात झालेल्या विद्यार्थी आंदोलनात पोलिसांच्या वाहनांची तोडफोड झाली होती. यात, समाजमाध्यमांवरून खोटी माहिती पसरवल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

<><><><><>

वाढता उत्पादन खर्च आणि विविध करांमुळे परवडणारी घरं बांधणं शक्य होत नाही. त्यामुळे स्वस्त घरांच्या मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारनं प्रोत्साहनात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी क्रेडाईनं केली आहे. केंद्र सरकारनं परवडणाऱ्या घरांची व्याख्या बदलावी, अशी मागणी क्रेडाईचे अध्यक्ष शेखर पटेल यांनी कोलकाता इथं आयोजित पत्रकार परिषदेत केली. सध्याची प्रति सदनिका ४५ लाख रुपयांची कमाल किंमत मर्यादा हटवावी, असंही ते म्हणाले. सरकार या मागण्यांवर सकारात्मक विचार करेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आज सहा सुवर्ण पदक, २ रौप्य आणि २ कांस्य पदकांची कमाई केली. भारताकडे सध्या १६ सुवर्ण, २५ रौप्य आणि ३५ कांस्यपदकांसह ७६ पदकं असून पदकतालिकेत भारत पाचव्या स्थानावर आहे. ऐकूया अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून

**व्हीसी**

*(हॉकी स्पर्धेत भारतीय महिला संघाने अंतिम सामन्यात चीनला १-०ने हरवत सुवर्ण पदक मिळवलं. या विजयामुळे भारताला ४४ वर्षांनंतर या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळालं असून हॉकी संघाचं २०२८च्या ऑलिम्पिक स्पर्धेतलं स्थानही निश्चित झालं आहे.*

*मुष्टीयुद्धात भारतीय खेळाडूंनी आज ४ सुवर्णपदकांची कमाई केली. लव्हलिना बोरगोनहेन हिने महिलांच्या ७५ किलो वजनी गटात, परवीन हुडाने महिलांच्या ६५ किलो वजनी गटात, सुजीत कलकल याने पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात आणि पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अंकुश पंघाल यानेही सुवर्णपदकाची कमाई केली.*

*महिलांच्या तिरंदाजीत रिकर्व्ह सांघिक गटात अंकिता भकत, कीर्ती शर्मा आणि कुमकुम मोहोड यांनी सुवर्ण पदक जिंकलं. मिश्र रिकर्व्ह सांघिक तिरंदाजी प्रकारातही कुमकुम मोहोड आणि धीरज बोम्मदेवरा यांनी रौप्यपदक जिंकलं. पुरुषांच्या रिकर्व्ह सांघिक प्रकारात भारताच्या धीरज बोम्मदेवरा, यशदीप भोगे आणि नीरज चौहान यांनीही रौप्यपदक पटकावलं. नौकानयन स्पर्धेत डिंगी प्रकारात नेत्रा कुमानन हिने कांस्यपदक जिंकलं. सेपाक-ताक्रॉ प्रकारात भारतानं पुरुषांच्या क्वाड्रंट स्पर्धेत कास्यपदक जिंकलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदकविजेत्या खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.*

*क्रिकेटमध्ये उद्या होणाऱ्या २० षटकांच्या अंतिम सामन्यात भारताची गाठ पाकिस्तानशी पडेल. हा सामना उद्या सकाळी साडे दहा वाजता सुरू होईल. दरम्यान, आशियाई स्पर्धांच्या परवा होणाऱ्या समारोप सोहळ्यात भारताची महिला ध्वजवाहक म्हणून नेमबाज नीरू धांडा हिची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेत नीरूने दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकावलं आहे. )*

**<><><><><>**

आशियाई स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवलेल्या हॉकी संघातल्या प्रत्येक खेळाडूला ११ लाख रुपये आणि इतर कर्मचाऱ्यांना प्रत्येकी साडे ५ लाख रुपये पुरस्कार जाहीर केला आहे. हॉकी इंडिया हा पुरस्कार देणार आहे.

**//<><><><><>//**